महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : सीबीटी-०६२२/प्र.क्र.११/२०२२/३१ दिनांक - १५ नोव्हेंबर, २०२२

- : **प्रसिद्धीपत्रक** :-

विशिष्ट शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभवावर आधारित सरळसेवा भरतीकरीता प्रसिद्ध खालील जाहिरातीस अनुसरून दिनांक २ डिसेंबर, २०२२ रोजी एकत्रित चाळणी परीक्षेचे आयोजन करण्यात येईल :-

| अ.क्र. | विभाग | संवर्ग | जाहिरात क्रमांक |
|---|---|---|---|
| (१) | सार्वजनिक आरोग्य विभाग | प्रशासकीय अधिकारी, सामान्य राज्यसेवा, गट-ब | ०२४/२०२२ |
| (२) | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | प्रशासकीय अधिकारी, आयुष संचालनालय, सामान्य राज्य सेवा, गट-ब, | ०२८/२०२२ |
| (३) | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | प्रशासकीय अधिकारी, अन्न व औषध प्रशासकीय सेवा, गट-ब, | ०२९/२०२२ |
| (४) | कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसायविभाग. | सहायक प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र कृषि प्रशासकीय सेवा, गट-ब | ०५५/२०२२ |
| (५) | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | प्रशासकीय अधिकारी, सामान्य राज्यसेवा, गट-ब | ०७९/२०२२ |
| (६) | उद्योग, उर्जा व कामगार विभाग | सहायक प्रशासन अधिकारी, गट-ब | ०८५/२०२२ |

**२. परीक्षेचे टप्पे :- दोन**

**(१) वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची परीक्षा — १०० गुण**

**(२) मुलाखत — २५ गुण**

**(३) अंतिम गुणवत्ता यादी ही वस्तुनिष्ठ बहुपर्यायी परीक्षा व मुलाखतीतील एकत्रित गुणांवर आधारित राहील.**

**३. परीक्षा योजना :- वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची परीक्षा**

| विषय व संकेतांक | गुण | प्रश्नसंख्या | कालावधी | दर्जा | माध्यम |
|---|---|---|---|---|---|
| सामान्य ज्ञान, बुध्दीमापन चाचणी व प्रशासकीय कामकाज (९७३) | १०० | ५० | एक तास | पदवी | मराठी |

**४. अभ्यासक्रम :-**

सामान्य ज्ञान, बुध्दीमापन विषयक व प्रशासकीय कामकाज या विषयांमध्ये खालील घटक व उपघटकांचा समावेश असेल:-

| अ.क्र. | | घटक व उपघटक |
|---|---|---|
| १ | | **सामान्य ज्ञान** |
| | (१) | **महाराष्ट्राचा इतिहास** |
| | (२) | **महाराष्ट्राचा भूगोल** |
| | (३) | **माहितीचा अधिकार कायदा -२००५** |
| | (४) | **भारतीय राज्यघटना** |
| | (५) | **संगणक व माहिती तंत्रज्ञान** |
| | (६) | **मानवी हक्क व जबाबदा-या** |
| | (७) | **जागतिक तसेच भारतातील चालू घडामोडी** - राजकीय, औद्योगिक, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, भौगोलिक, खगोलशास्त्रीय, सांस्कृतिक, वैज्ञानिक, इत्यादी. |

| | | |
|---|---|---|
| २ | | **बुध्दिमापन विषयक प्रश्न**<br>उमेदवार किती लवकर व अचूकपणे विचार करु शकतो याचा अंदाज घेण्याच्या दृष्टिने सदर प्रश्न विचारण्यात येतील. |
| ३ | | **प्रशासकीय कामकाजाच्या संदर्भात लागू होणारे नियम व आदेश** |
| | (१) | महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ |
| | (२) | महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ |
| | (३) | महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, परकीय सेवा, निलंबन, बडतर्फी सेवेतून काढून टाकणे या काळातील प्रदाने ) नियम, १९८१ |
| | (४) | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ |
| | (५) | महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन ) नियम, १९८२ |
| | (६) | महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील ) नियम, १९७९ / विभागीय चौकशी पुस्तिका |
| | (७) | महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ |
| | (८) | लेखा विषयक बाबत |
| | (९) | ज्येष्ठता सूचीबाबत |
| | (१०) | कार्यालयीन कार्यपध्दती |
| | (११) | प्रशासकीय बाबी |
| | (१२) | न्यायालयीन बाबी |

**५. संगणकीय उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन :-**

(१) वस्तुनिष्ठ स्वरुपांच्या संगणकीय उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना संगणकीय उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच, प्रत्येक चुकीच्या उत्तरामागे २५% किंवा १/४ एवढे गुण त्या प्रश्नाला असलेल्या गुणांमधून वजा करण्यात येतील.

(२) एखादा प्रश्न अनुत्तरित असेल तर अशा प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दत लागू असणार नाही.

(३) वरीलप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करताना एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच गणण्यात येईल व पुढील कार्यवाही त्याच्या आधारे करण्यात येईल.

**सह सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

**दिनांक : १५/११/२०२२**